**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

**दिनांक २०/०२/२०२५ (गुरूवार) दुपार**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई
## वाहतुक शाखा नागपुर ग्रामीण जिल्हा यांची कारवाई

दिनांक १९/०२/२५ रोजी जिल्हा वाहतुक शाखा नागपुर ग्रामीण चे पथक हे रामटेक हददीत वाहतुक नियोजन करीत असतानां त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा मनसर पुल येथे नाकाबंदी केली असता संशयीत १२ चक्का टिप्पर क्र. एम एच ३४ बी झेड ५८७० आले त्यास थांबवुन पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. चालक आरोपी नामे १) पुनम रूपचंद कनसरे रा.बोकारा नागपुर, २) कोमल नथ्थु दत्तात्रेय रा.पलोटी स्कुल मागे नागपुर हे मिळुन आले त्यांना परवान्याबाबत विचारपुस केली असता त्यांच्या कडे कोणताही परवाना नव्हता . तसेच रेतीची वाहतुक आरोपी क्र ३) अमर लांजेवार रा.जरीपटका नागपुर यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. सदर टिप्पर चा मालक आरोपी क्र ४) मोहम्मद सारूख शेख,रा. जरीपटका नागपुर हा आहे अशी माहीती पोलीसांना मिळाली. पोलीसांनी आरोपींच्या ताब्यातुन पंचासमक्ष १२ चक्का टिप्पर क्र.एम एच ३४ बी झेड ५८७० किंमती ३५,०००००/रूपये आणि ०९ ब्रास रेती किंमती ४५०००/—रूपये असा एकुन ३५,४५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.

आरोपी १) पुनम रूपचंद कनसरे रा. बोकारा, नागपुर,२) कोमल नथ्थु दत्तात्रेय, रा. पलोटी स्कुल मागे नागपुर, ३) अमर लांजेवार, रा. जरीपटका नागपुर ,४) मोहम्मद सारूख शेख, रा. जरीपटका नागपुर यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन रामटेक येथे कलम ३०३(२),४९,३(५) भान्यासा ,४८(७)४८(८) मजमसंहिता ,४,२५ खाण आणि खणिज ,३ सार्व.संपत्ती अधि.,१७७ मो.वा. अधि.अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **आरोपी क्र १ आणि २ यांना अटक करण्यात आली आहे.**

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर